# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
**Website :** www.unipune.ac.in.

**Board of Examinations & Evaluation**
**Ganeshkhind, Pune - 411007**
**Phone: 2025621398**
**E-mail:** dyrst@pun.unipune.ac.in

---

संदर्भ : परीक्षा/ S&T/268.　　　　　　　　दिनांक : 16/02/2024

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा)

**विषय** : उन्हाळी परीक्षा २०२३ च्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये विशेष प्रवेश संधी बाबत...

**संदर्भ** : परिपत्रक क्र. १९७/२०२३, जा. क्र. सीबी/९२३, दिनांक ०६/०९/२०२३

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय परिपत्रकान्वये उन्हाळी २०२३ विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविज्ञान व आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांतील पदवी (इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांसह) परीक्षेमध्ये अनुर्त्तीण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये विशेष प्रवेश संधी देण्यात आलेली आहे.

याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, उपरोक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये विशेष प्रवेश संधी अंतर्गत तात्पुरता प्रवेश देण्यात आलेला असून हिवाळी २०२३ मध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे पुढील वर्षामध्ये प्रवेश घेतल्याचे चलन आणि याबाबतचे महाविद्यालयाचे पत्र ही सर्व माहिती महाविद्यालयाने **URL : https://examinward.unipune.ac.in/ExamformOnline/auth/login_College.aspx Login Id & Password as per Exam-Form Inward Process. Under Menu, check option "Provisional Special Admission"** या ऑपशनमध्ये दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ ते दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत भरण्यात यावी. जेणेकरून संबंधित पात्र विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षा २०२४ करिताचे परीक्षा आवेदन अर्ज भरताना समस्या निर्माण होणार नाही.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
छाननी व तालिनीकरण

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९

Telephone : 020-25621156/57/79

ईमेल/ Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)

Academic Section (Approval Cell)

वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. १९७ /२०२३

विषय :– 'उन्हाळी परीक्षा २०२३' च्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये विशेष प्रवेश संधी बाबत....

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उन्हाळी २०२३ विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान व आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांतील पदवी (इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांसह) परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये विशेष प्रवेश संधी देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्राकरिता किंवा जेथे लागू असेल तेथे द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या सातव्या सत्राकरिता तात्पुरता प्रवेश काही अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात यावा व त्याबाबतचे विहीत हमीपत्र प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाकडे सादर करणे अनिवार्य असेल.

२. तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्रामध्ये अथवा चतुर्थ वर्षाच्या सातव्या सत्रामध्ये तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी जसे अध्ययन, प्रात्यक्षिके, सत्रकर्म, फिल्ड व्हिजिट व इतर बाबी महाविद्यालयाने इतर नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे पूर्ण करून घ्याव्यात. त्याबाबतच्या परीक्षा व इतर बाबी या हिवाळी २०२३ (ऑक्टोबर) या परीक्षांमध्ये अनुशेषाने विषय पूर्णत: उत्तीर्ण होऊन जे विद्यार्थी प्रचलित तृतीय/चतुर्थ वर्षामध्ये प्रवेश घेण्यास पात्र ठरतील अशाच विद्यार्थ्यांचा प्रवेश पुढील सत्रासाठी सुरू ठेवण्यात येईल. मात्र सर्व विद्यार्थ्यांची सत्र ५/७ मधील अध्ययन, अध्यापन, प्रात्यक्षिके, सत्रकर्म, फिल्ड व्हिजिट व इतर बाबी, परीक्षांमधील संपादणूक ग्राह्य धरावी.

३. सत्र पाचवे व सहावे/सातवे व आठवे करिताच्या सत्र समाप्तीच्या लेखी परीक्षा संबंधित विद्यार्थ्यांना एकत्रित अर्थात उन्हाळी (२०२४) च्या परीक्षांमध्ये देता येतील.

४. जे तात्पुरते प्रवेशित विद्यार्थी हिवाळी २०२३ मधील परीक्षेमध्ये प्रथम, द्वितीय/तृतीय वर्षाचे अनुशेष पूर्ण करू शकणार नाहीत व प्रचलित नियमानुसार तृतीय/चतुर्थ वर्षाच्या पाचव्या/सातव्या सत्राकरीता अपात्र ठरतील अशा विद्यार्थ्यांचा तात्पुरता प्रवेश हा आपोआप रद्द होईल. त्याकरिता अशा विद्यार्थ्यांना त्यांनी महाविद्यालयाकडे जमा केलेल्या शैक्षणिक शुल्क व इतर बाबी यांचा परतावा देय राहणार नाही.

पुढे असेही कळविण्यात येते की, ज्या अभ्यासक्रमांना शिखर संस्थांचे या संदर्भात विशिष्ट असे नियम लागू असतील अशा अभ्यासक्रमांच्या बाबतीत त्या–त्या शिखर संस्थांचे या संदर्भातील नियम लागू राहतील.

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/परिसंस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

6/9/2023

गणेशखिंड, पुणे – ४११००७
जा. क्र. :– सीबी/ ९२३
दिनांक :– ०६/०९/२०२३

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:–**

१. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये व परिसंस्था
४. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
५. सहायक कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

मा. विद्यापरिषद ठराव क्र. – अ १ पीए/१/२०२३ दि. ४ सप्टेंबर, २०२३